Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १०० • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.४ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नातून जिल्ह्यासाठी भाजीपाला संशोधन केंद्र मंजूर

## ८५ लक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात नमो शेतकरी योजनेचा हप्ता जमा–कृषीमंत्री धनंजय मुंडे

## जंगलालगत गावातील शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानावर कुंपन–पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील ऐकार्जुना येथे कापूस उत्पादन संशोधन केंद्र असून येथे २३ प्रकारच्या कपाशीची लागवड केली जाते. असेच एक संशोधन केंद्र भाजीपालाकरीता असावे, असा विचार गत महिन्यात ऐकार्जुना येथील शास्त्रज्ञ शेतकरी संवाद कार्यक्रमात आला. त्यानुसार कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे मागणी केली आणि एक महिन्यातच ही मागणी फळाला येऊन आज जिल्हास्तरीय कृषी महोत्सवात भाजीपाला संशोधन केंद्र मान्यतेचा कागद हाती आला. ऐकार्जुना येथे ३१ कोटी ९० लक्ष रुपये खर्च करून उच्च तंत्रज्ञानयुक्त भाजीपाला संशोधन केंद्र उभे राहणार असल्याचा आनंद आहे, अशा भावना राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या.चांदा क्लब ग्राऊंड येथे आयोजित जिल्हास्तरीय कृषी महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर कृषी मंत्री धनंजय मुंडे, आमदार किशोर जोरगेवार, म.रा. खादी ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रविंद्र साठे, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, बांबू बोर्डाचे अध्यक्ष श्रीनिवास राव, ताडोबाचे क्षेत्रीय संचालक जितेंद्र रामगावकर, आत्माच्या प्रकल्प संचालक प्रिती हिरुळकर, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, विनीता व्यास, हरीश शर्मा, राहुल पावडे, देवराव भोंगळे, डॉ. मंगेश गुलवाडे, नरेंद्र जिवतोडे आदी उपस्थित होते.चंद्रपूर जिल्ह्यात भाजीपाला हा हैद्राबाद, नागपूर, गडचिरोली, भंडारा येथून येतो, असे सांगून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, कापूस उत्पादन संशोधन केंद्राप्रमाणेच भाजीपाला संशोधन केंद्र जिल्ह्यात असावे, असा विचार गत महिन्यातच आला. त्यानुसार कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे मागणी केली आणि एका क्षणात त्यांनी ऐकार्जुना येथे भाजीपाला संशोधन केंद्राला मान्यता दिली. त्यासाठी मी कृषीमंत्री श्री. मुंडे यांचा व्यक्तिशः आभारी आहे.पुढे पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, जगामध्ये कितीही तंत्रज्ञान विकसीत झाले तरी शेतमाल हा मातीतच पिकविला जातो. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात आता तांत्रिक शेती, बांबु शेती, वनशेती, रानभाजी शेती असे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहे. सरकार शेतक-यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असून १ रुपयांत पीक विमा देणारे महाराष्ट्र हे जगात एकमेव उदाहरण आहे. वन्यप्राण्यांमुळे शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यामुळे जंगल क्षेत्र असलेल्या गावातील शेतक-यांना राज्य सरकारकडून ९० टक्के अनुदानावर कुंपन देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले.जिल्हास्तरीय कृषी महोत्सव पाच दिवस चालणार असून यात पशुप्रदर्शनी, ६७५० किग्रॅ खिचडीचा विक्रम, ४३ इंचाची पुंगनुर गाय, नोंदणी केलेल्या शेतक-यांना लकी ड्रॉ द्वारे शेवटच्या दिवशी आकर्षक बक्षीसे, सांस्कृतिक कार्यक्रम हे विशेष आकर्षण आहे. राज्याचा वित्तमंत्री असतांना प्रत्येक जिल्ह्यात कृषी प्रदर्शनीसाठी २० लक्ष रुपये देण्याचा निर्णय सर्वप्रथम आपणच घेतला, असेही त्यांनी सांगितले.

आज जग बदलले आहे. त्यामुळे शेतक-यांनी पारंपरिक शेतीऐवजी २१ व्या शतकात आधुनिक तंत्रज्ञानयुक्त शेती करावी व शेतीला व्यवसाय म्हणून स्वीकारावे. स्मार्ट प्रकल्प, स्टार्टअप, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना आदींमधून शेतकरी उत्पादक कंपन्यांना अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेतक-यांच्या शेतमालाला भाव देण्यासाठी एक महिन्याच्या आत राज्य सरकारच्या कृषी विभागाने मोठ्या कंपन्यांसोबत करार केला आहे. सोबतच पेरलेल्या आणि उगविलेल्या मालाला भाव देण्याचा अंदाज कृषी विभाग देणार आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेत राज्यातील १ कोटी ७० लक्ष शेतक-यांनी सहभाग नोंदविला असल्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी सुध्दा मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी, बचत गटाच्या महिला, विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, कृषीमंत्री धनंजय मुंडे, आमदार किशोर जोरगेवार आदींनी कृषी महोत्सवातील विविध स्टॉलची पाहणी केली.

### ८५ लक्ष शेतक-यांच्या खात्यात नमो शेतकरी योजनेचा हप्ता जमा – कृषीमंत्री मुंडे

**केंद्र व राज्य सरकार कृषी क्षेत्राच्या विकासासाठी अग्रेसर असून देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी संकटाच्या काळात शेतक-यांना पी.एम. किसान योजनेंतर्गत ६ हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेला जोड म्हणून राज्य सरकारनेसुध्दा नमो शेतकरी योजना सुरू केली आहे. या अंतर्गत शेतक-यांना राज्य सरकारकडून अतिरिक्त ६ हजार रुपये देण्यात येत आहे. आतापर्यंत राज्यातील ९७ लक्ष शेतक-यांपैकी ८५ लक्ष शेतक-यांच्या खात्यात नमो शेतकरी योजनेचा पहिला हप्ता जमा करण्यात आल्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितले. उर्वरीत शेतक-यांच्या खात्यात लवकरच हा हप्ता जमा केला जाणार आहे.**

**जिल्ह्यात दोन मधाचे गाव**

चंद्रपूर जिल्हा वाघ, साग, चिमूर क्रांती, कोळसा, वन यासाठी प्रसिध्द आहे. आता पिर्ली आणि मामला या दोन गावांची मधाचे गाव म्हणून निवड झाल्यामुळे चंद्रपूर जिल्हा हनी क्रांतीचा महत्वाचा भाग होईल.

**नोंदणी करण-या शेतक-यांनाच धानाचा बोनस**

चंद्रपूर जिल्हा हा धान उत्पादक जिल्हा आहे. जिल्ह्यात १ लक्ष ८४ हजार हेक्टरवर धानाची शेती केली जाते. राज्य सरकारने धानाला २० हजार रुपये प्रति हेक्टर बोनस जाहीर केला आहे. मात्र नोंदणी केलेल्या शेतक-यांनाच या बोनसचा लाभ मिळणार आहे.

**फर्निचर क्लस्टरकरीता ४८ कोटी रुपये मंजूर**

एम.आय.डी.सी.च्या धर्तीवर आता एफ.आय.डी.सी. ची निर्मिती होणार असून लाकडावर कोरीव काम करणा-यांसाठी ४८ कोटी रुपये खर्च करून फर्निचर क्लस्टर तयार करण्यात येत आहे.

**नाविन्यपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ**

यावेळी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते बळीराजा समृध्दी मार्ग शेतपाणंद रस्ते योजनेचा शुभारंभ, मधाचे गाव म्हणून पिर्ली (ता. भद्रावती) चे उद्घाटन, मिशन जयकिसान योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

---

माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या उपस्थितीत

# भाजपा जनसंपर्क कार्यालय अहेरी येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी




**अहेरी । प्रतिनिधी**

माजी राज्यमंत्री तथा पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या जनसंपर्क कार्यालय अहेरी येथे स्त्रियांना शिक्षण देणाऱ्या आद्य शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त माल्यार्पण,पूजन व विनम्र अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी भाजपचे पदाधिकारी व नगरसेवक, नगरसेविका यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

या कार्यक्रमा दरम्यान माजी राज्यमंत्री तथा पालकमंत्री गडचिरोली जिल्हा श्रीमंत राजे अंब्रिशराव आत्राम यांनी फुले यांच्या जीवनावर बोलत ते म्हणाले की,महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहीशी करण्यासाठी त्यांनी काम केले. फुले यांनी विधवांचे होणारे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला होता. त्या एक लेखिका देखील होत्या. त्यांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले आहे. १८९७ मध्ये प्लेगची साथ आल्यावर त्यांनी लागण झालेल्या लोकांसाठी काम केले. या प्रक्रियेत सावित्रीबाई फुले यांना देखील प्लेगची लागण झाली. १० मार्च १८९७ रोजी त्यांचा मृत्यू झाला.३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिवस संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिन व महिला मुक्तीदिन म्हणून साजरा केला जातो. १० मार्च १९९८ रोजी भारत सरकारने सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध केले. २०१५ मध्ये, पुणे विद्यापीठाचे नामकरण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे करण्यात आले. ३ जानेवारी, २०१७ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या १८६ व्या जन्मदिनानिमित्त गूगल डूडल प्रसिद्ध करून गूगलने त्यांना अभिवादन केले.

---

# ना.मुनगंटीवार सेवा केंद्रात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

## अस्पृश्यता निर्मूलन आणि स्त्रीमुक्ती हेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे ध्येय– किरण बोढे




**घुग्घुस । प्रतिनिधी**

शहरातील नामदार सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले.

यावेळी प्रयास सखी मंच घुग्घुसच्या अध्यक्षा किरण बोढे, भाजपच्या नितु चौधरी, सुचिता लुटे, अमीना बेगम, पुष्पा रामटेके, दुर्गा कंटे, अनिशा मुसळे, शीतल सोनटक्के, निशा राजूरकर, छाया मंगाम, आरती बिहार, वैजनती मोहती, सुनीता महाकुलकर, अश्विनी श्रीनिवास, प्रीती प्रजापती व मोठया संख्येत महिला उपस्थित होत्या.प्रयास सखी मंच घुग्घुसच्या अध्यक्षा किरण बोढे म्हणाल्या, अस्पृश्यता निर्मूलन, स्त्रीमुक्ती, आणि दलित स्त्रियांना शिक्षित करणे हेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे ध्येय होते.भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका होण्याचे श्रेय सावित्रीबाई फुले यांना जाते. देशातील महिलांना शिक्षणासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले. सावित्रीबाई फुले यांचे महत्वाचे कार्य १ जानेवारी १८४८ रोजी सावित्रीबाई फुले यांनी पुणे शहरातील भेडीवाडी येथे मुलींसाठी शाळा उघडली. ३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रात त्यांचा जन्म झाला. ३ जानेवारी हा सावित्रीबाईचा जन्म दिवस संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिन व महिला मुक्तीदिन म्हणून साजरा केला जातो. १० मार्च १८९७ रोजी त्यांचा मृत्यू झाला. महात्मा ज्योतिबा फुले यांच्यासोबत त्यांनी महिलांचे अधिकार सुधारण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली. सावित्रीबाई फुले यांना स्त्रीवादाची जननी मानले जाते.

---

# सरस्वती नर्सिंग स्कूल सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक सरस्वती नर्सिंग स्कूल गुंजखेडा, येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी व्यासपीठावर आई सरस्वती बहुउद्देशीय महिला विकास संस्थेचे संस्थापक डॉ.मिलिंद ठोंबरे संस्थाध्यक्ष भारती मिलिंद ठोंबरे उपस्थित होत्या. सर्वप्रथम दिपप्रज्वलन करून प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले, यावेळी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जिवनावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला.मुलींना शिक्षणाचा समान अधिकार मिळावा याकरिता केलेलं प्रयत्न, प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी केलेले उल्लेखनीय कामगिरी,तसेच आज हि स्त्रीयावर होणारे अत्याचार तसेच बदलती सामाजिक परिस्थिती यावर आपल्या अध्यक्षीय भाषणातून मत मांडले, ह्यावेळी सरस्वती नर्सिंग स्कूल मधिल सर्व कर्मचारी उपस्थित होते.



# प्राथमिक शिक्षकांच्या खांद्यावर अशैक्षणिक कामांचे ओझे?

**शिक्षण आणि शिक्षक हा कोणाच्याही प्राधान्याचा विषय राहिलेला नाही. इतर राष्ट्रांच्या मनाने शिक्षणावर केला जाणारा खर्चही कमीच आणि शिक्षकांप्रती आदरही कमीच. सद्यस्थितीत शिक्षक हा सरकारी कामगार बनला आहे हे वास्तव आहे. ते कसे पुसणार? शिक्षकाला शाळाबाह्य व शैक्षणिक कामालाच जुंपण्यात सर्व संबंधित धन्यता मानत आहे. एकीकडे शाळांची गुणवत्ता वाढली पाहिजे.समाज सुधारला पाहिजे. सरकारी शाळा टिकल्या पाहिजे. एकही मूल शाळाबाह्य राहता कामा नये असे थाटात सांगायचे. परंतु दुसरीकडे शिक्षकांना अशैक्षणिक कामात जुंपून त्याला जास्तीत जास्त काळ वर्गाबाहेर ठेवून त्यांची आणि विद्यार्थ्यांची नाळ तोडायची याला काय म्हणायचे?हा शासनाचा दोगलेपणा नव्हे का?**




मागील महिन्यात एका कामाच्या निमित्ताने यवतमाळ जिल्ह्यातील माझ्या स्वगावी जाण्याचा योग आला. मारेगाव तालुक्यातील अगदी शेवटच्या टोकावर वसलेलं हे दुर्लक्षित गाव. दांडगांव. जिथे आमची वडिलोपार्जित शेती आहे. गावात गेल्यानंतर जुनी मित्रमंडळी भेटली. इकडल्या तिकडल्या गप्पा झाल्या. सहजच चर्चांच्या ओघात जुनी आठवणीतील काही मित्रमंडळी काय करतात? म्हणून चौकशी केली. त्यापैकी एकजण प्राथमिक शाळेतून सेवानिवृत्त झालेला होता. त्याच्याशी प्राथमिक शिक्षणासंदर्भात गप्पा झाल्या. त्याने प्राथमिक शिक्षणातील शिक्षणाकडे शासनाचे सुरू असलेले दुर्लक्ष यासंदर्भात बोलताना मते अधोरेखित केली. गप्पाच्या ओघात बोलताना त्याने शासन प्राथमिक शिक्षणाकडे कसे दुर्लक्ष करत आहे या संदर्भात भावना व्यक्त केल्या.

असेच जर शासकीय धोरण सुरू राहिले तर पुढे या देशातील सर्वसामान्य कुटुंबातील, गरीब घरातील छोट्या मुलांचं भवितव्य अंधकारमय आहे. पुढे होणाऱ्या भावी पिढीचं काही खरं नाही अशी शोकांतिका व्यक्त केली. प्राथमिक शिक्षण शिकविणाऱ्या शिक्षकांकडे शिक्षण सोडून शासनाने अनेक अशैक्षणिक उपक्रम सोपविलेले आहेत. अनेक कामांचे ओझे शिक्षकांकडे आल्यामुळे ज्या शिक्षकांवर विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवायची जबाबदारी आहे. तोच शिक्षक अशैक्षणिक कामांच्या ओझ्याखाली दबल्यामुळे शिक्षणाचा दर्जा घसरणे स्वाभाविकच आहे अशी तक्रार बोलण्यातून त्याने केली. ज्या शाळेमध्ये एक शिक्षक आहे. त्या शाळेमध्ये शिक्षकांचे हाल होत आहेत. विद्यार्थ्यांना सांभाळून अशैक्षणिक कामे करताना त्यांच्या नाकीनऊ येत आहे.

अलीकडे शिक्षक शिकविण्यासाठी आहे की शासनाची अशैक्षणिक कामे करण्यासाठी? नेमका कुठल्या कामासाठी त्याची नियुक्ती झाली आहे हेच कळायला मार्ग नाही. ज्या आवडीने शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षक म्हणून रोजगार स्वीकारला ते ध्येय फारसे साध्य झाले नाही असे दृष्टिक्षेपात येते. शिक्षकांना असलेली असलेली कामे कोणती? असा सहज प्रश्न मी त्याला विचारला असता त्यांनी जी कामाची यादी सादर केली ते पाहून आमच्या सर्वांच्या अंगाला घाम सुटला. ही सगळी कामे करावी लागणारा शिक्षक आहे की संगणक कळेनासे झाले. यातील काही कामे आपल्याला माहिती व्हावी म्हणून मुद्दामून सांगतो.नुसती वाचली तरी त्यातून आवाका लक्षात येईल.

उदाहरणार्थ मतदार नोंदणी करणे, मतदार याद्या तयार करणे, जनगणना करणे, पटनोंदणी करणे, हत्तीपाय निर्मूलनासाठी सर्वेक्षण, वृक्षारोपण, शाळेची रंगरंगोटी, बीएलओ कुटुंब सर्वेक्षण, विविध प्रकारची ऑनलाईन माहिती भरणे, उपस्थित भत्त्यांच्या नोंदी ठेवणे, ४० पेक्षा जास्त नोंदवह्या अध्ययन करणे,अध्यायावत ठेवाव्या लागतात, लसीकरण मोहीम राबविणे, जंतूनाशक गोळ्या वाटप करणे, अहवाल देणे, शासनाच्या कोणत्याही मोहिमेच्या प्रचारासाठी प्रभातफेरी काढणे, माध्यान्ह भोजनाच्या नोंदी करणे, त्याचा हिशोब ठेवणे, भाजीपाला खरेदी करणे, त्याचा हिशोब ठेवणे, विद्यार्थ्यांचे आधार अपडेट करणे, लोकांकडून देणगी जमा करून शाळेच्या गरजा भागवणे, विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून घेणे, वेगवेगळ्या योजना व परीक्षांचे ऑनलाईन अर्ज भरणे, घरोघरी जाऊन शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांच्या नोंदी ठेवणे, अनेकदा पोलीस पंचनाम्यामध्येही पंच म्हणून उपस्थित राहावे लागते, शासनाच्या विविध विभागांना सहकार्य करणे, वृक्ष लागवड अहवाल देणे, सरल प्रणालीची माहिती भरणे, यु–डायस माहिती भरणे, कोकणात तर वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून शिक्षकांची नेमणूक केली जाते, तसेच गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या चाकरनाम्यांची व्यवस्था करावी लागते.अशा विविधप्रकारे छोट्या–मोठ्या मिळून जवळपास ७५ ते १३५ अशैक्षणिक कामांना शिक्षकांना जुंपले जात असल्याने त्यांना खरेच शैक्षणिक काम करायला वेळ मिळत असेल का?

कुठलाही नवीन शिक्षक जेव्हा शिक्षक म्हणून रुजू होतो. तेव्हा तारुण्यात त्याच्या मनामध्ये अनेक स्वप्ने असतात. जुनी शिक्षकांची पिढी ही कर्मवादी पिढी होती. तत्ववादी होती. त्यांच्या हाताखाली शिकलेली आजच्या पन्नाशीतील पिढी अनेक स्वप्ने घेऊन शिक्षण व्यवसायात आली. ज्याप्रमाणे ध्येयवादी शिक्षकांचा आदर्श समोर ठेवून शिक्षक झालो. आपल्या विद्यार्थ्यांनीही आयुष्यामध्ये एक उत्तम नागरिक बनावे यासाठी प्रयत्न करण्याची धडपड त्याच्या मनामध्ये असते. परंतु वरील अशैक्षणिक कामाची यादी जर वाचली तर खरोखरच तो शिक्षक आहे की आणखी कोण? असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. अलीकडे काही मंडळी प्राथमिक शिक्षणाच्या विशेषतः सरकारी शाळेमध्ये शिक्षणाकडे टीका करताना दिसतात. शासकीय शाळांचा शैक्षणिक दर्जा घसरला असे ओरडले जाते. परंतु वरील कामांच्या यादीची लांबी बघितली तर हा शैक्षणिक दर्जा घसरणार नाही तर काय. नक्कीच घसरणार आहे. शेवटी शिक्षक हाही एक माणूस आहे. त्यालाही मानवी शारीरिक क्षमता आहे. त्या क्षमता ओलांडून जर त्याच्याकडून अशी अशैक्षणिक कामे करून घेतली जात असेल तर तो तरी कुठपर्यंत टिकणार आहे. साहजिकच त्याचे शैक्षणिक कार्याकडे दुर्लक्ष होणार आहे. त्या प्रमाणामध्ये शिक्षणात सक्षम होऊ शकत नाही.

हे सर्व टाळायचे असेल तर शासनाने सर्वात पहिल्यांदा प्राथमिक शिक्षकांना शैक्षणिक कामा व्यतिरिक्त इतर कामांचा बोजा लादू नये असे वाटते. शासनाची ही जी आशैक्षणिक कामे आहे ती पार पाडण्यासाठी त्यांनी समाजातील बेरोजगार तरुणांचा आधार घ्यायला घ्यावा . अनेक बचतगट आहे, स्वयंसेवी संस्था आहे. त्याच्याकडून ती कामे करून घ्यायला पाहिजे. म्हणजे शासनाची ही कामेही पार पडतील आणि शिक्षकांना शिक्षण देण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल. परंतु शासनाची भूमिकाच संशयास्पद आहे. एकीकडे आदर्श शिक्षण पद्धतीसाठी भाषणे ठोकायची. दुसरीकडे अशा अशैक्षणिक कामांचा बोजा लादून शिक्षकांचा उत्साह कमी करायचा. जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या बाबतीमध्ये हा प्रकार नेहमी घडतो. शासनाला जर खरोखरच प्राथमिक शिक्षणाबद्दल आस्था असेल तर त्यांनी शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षकांना अधिकाधिक प्रोत्साहित केले पाहिजे. सातत्याने प्रयोगशील केले पाहिजे. सरकारी शाळा टिकवणे ही आता सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळे अशी कामे शिक्षकांना देऊ नये.

शिक्षकांकडून अशैक्षणिक कामे काढून घेऊन त्यांच्याकडून शिकविण्याचेच काम चांगल्याप्रकारे कसे होईल यासाठी शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. शैक्षणिक कामांसाठी शिक्षकांनी पुरेसा वेळ दिल्यामुळे त्याचा अनुकूल परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होईल. इतर कामे राष्ट्रीय कामे म्हणून शिक्षकांच्या माथी मारली जात असतील तर सर्वसामान्य जनतेच्या पाल्यांना अध्यापन करणे हे काम राष्ट्रीय नाही का? असा प्रश्न या निमित्ताने शासनाला विचारावासा वाटतो. एकीकडे जनतेच्या उद्धाराचा डिंडोरा पिटायचा आणि दुसरीकडे त्याच्या विपरीत वागायचे हे दोगलेपण आतातरी शासनाने थांबवले पाहिजे. शिक्षकांना केवळ आणि केवळ शिक्षणाचेच काम दिले पाहिजे. कारण त्यांची नियुक्ती ही शैक्षणिक कामासाठी झालेली आहे.

# ममता– वात्सल्यसिंधू सिंधुताई सपकाळ!

सिंधुताई सपकाळ या भारतीय सामाजिक कार्यकर्त्या होत्या. त्या विशेषतः भारतातील अनाथ मुलांचे संगोपन करण्याच्या कार्यासाठी ओळखल्या जातात. त्यांना नुकताच २०२१मध्ये सामाजिक कार्य श्रेणीत पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या वेळोंवेळी अनेक गौरवांच्या मानकरी ठरल्या. सिंधुताईंना सुमारे ७५० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांतील पद्मश्री पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, पुण्याच्या अभियांत्रिकी कॉलेजचा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा अहिल्याबाई होळकर पुरस्कार, मूर्तिमंत आईसाठीचा राष्ट्रीय पुरस्कार, आयटी प्रॉफिट ऑर्गनायझेशनचा दत्तक माता पुरस्कार, सोलापूरचा डॉ.निर्मलकुमार फडकुले स्मृती पुरस्कार,राजाई पुरस्कार, शिवलीला महिला गौरव पुरस्कार, श्रीरामपूर अहमदगर जिल्हा येथील सुनीता कलानिकेतन न्यासातर्फे कै.सुनीता त्र्यंबक कुलकर्णी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा सामाजिक सहयोगी पुरस्कार, सीएनएन– आयबीएन आणि रिलायन्स फाउंडेशनने दिलेला रिअल हीरो पुरस्कार, दैनिक लोकसत्ताचा सह्याद्रीची हिरकणी पुरस्कार, प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती पुरस्कार, डॉ.राम मनोहर त्रिपाठी पुरस्कार, पुणे विद्यापीठाचा जीवन गौरव पुरस्कार आदींचा समावेश आहे.



सिंधुताईंचा जन्म आणि त्यांचे सुरवातीचे जीवन खडतर होते. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १९४७ रोजी वर्धा जिल्ह्यातील पिंप्री मेघे गावात आणि ब्रिटीश भारतातील बेरार येथील अभिमन्यू साठे या गुराख्याच्या घरी झाला. एक अवांच्छित मूल असल्याने त्यांचे नाव चिंधी– फाटलेल्या कापडाचा तुकडा ठेवले. पण हीच चिंधी अनेक फाटक्या ठिगळांना जोडते, याचा त्यावेळी कोणी विचारही केला नसेल. अत्यंत गरिबी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि लवकर लग्न यामुळे त्यांना चौथी इयत्ता उत्तीर्ण झाल्यानंतर शाळा सोडावी लागली. त्यांचे वयाच्या बाराव्या वर्षी श्रीहरी सपकाळ यांच्याशी लग्न झाले, जे त्यांच्यापेक्षा तब्बल वीस वर्षांनी मोठे होते. लग्नानंतर त्या वर्ध्यातील सेलू येथील नवरगाव गावात गेल्या. घरी प्रचंड सासुरवास होता. कुटुंबात शैक्षणिक वातावरण नाही. जंगलात लाकूडफाटा, शेण गोळा करताना सापडलेले कागदाचे तुकडे माई घरी आणायच्या आणि उंदराच्या बिळांत लपवून ठेवायच्या. क्वचित घरी एकट्या असल्या तर त्या अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत. अठराव्या वर्षापर्यंत माईंची तीन बाळंतपणे झाली. त्या चौथ्या वेळी गर्भवती असताना त्यांनी त्यांच्या आयुष्यातला पहिला संघर्ष केला. तेव्हा गुरे वळणे, हाच व्यवसाय असायचा. गुरेही शेकड्यांनी असायची. त्यांचे शेण काढता काढता बायकांचे कंबरडे मोडायचे. शेण काढून बाया अर्धमेल्या व्हायच्या. पण त्याबद्दल कोणतीही मजुरी मिळायची नाही. रस्त्यावर मुरूम फोडणाऱ्यांना मजुरी, पण शेण काढणाऱ्यांना नाही. या शेणाचा लिलाव फॉरेस्टवाले करायचे. इथे सिंधुताईंनी बंड पुकारले आणि लढा सुरू केला. त्यामुळे या लिलावात ज्यांना हप्ता मिळायचा त्यांच्या हप्त्यावर गदा आली. हा लढा जिंकल्या पण त्यांना या लढ्याची जबर किंमत चुकवावी लागली. ताईंच्या या धैर्याने गावातील जमीनदार, दमडाजी असतकर दुखावला गेला होता. जंगलखात्याकडून येणारी मिळकत बंद झाली. दमडाजीने सिंधुताईंच्या पोटातील मूल आपले असल्याचा प्रचार सुरू केला. नवऱ्याच्या मनात त्यांच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण झाला आणि पूर्ण दिवस भरलेल्या ताईंना त्याने बेदम मारून घराबाहेर काढले. गुरांच्या लाथा बसून मरतील म्हणून तशा अर्धमेल्या अवस्थेत त्यांना गोठ्यात आणून टाकले. त्या अवस्थेत त्यांना कन्या जन्माला आली. नवऱ्याने हाकलल्यानंतर गावकऱ्यांनीही हाकलले. हे लग्न फार काळ टिकले नाही आणि वयाच्या वीसव्या वर्षीच त्यांना त्यांच्या मुलीसोबत नवऱ्याने सोडून दिले.

माराने अर्धमेल्या झालेल्या सिंधुताई माहेरी आल्या, पण सख्ख्या आईनेही पाठ फिरवली. परभणी, नांदेड, मनमाड रेल्वे स्टेशनांवर त्या भीक मागत हिंडायच्या. चतकोर भाकर, उष्टावलेले एखादे फळ हाती लागेल, म्हणून रात्रभर रेल्वे रुळांच्या कडेने फिरायच्या. एकदा जळगाव जिल्ह्यातील पिंपराळा स्टेशनवर त्यांनी आत्महत्येचा प्रयत्नही केला. पण लहान मुलीचा जीव घेतला तर पाप लागेल म्हणून मागे फिरल्या. मग पुन्हा भीक मागत पोट भरणे सुरू झाले. त्या दिवसभर भीक मागायच्या आणि रात्री स्टेशनवरच झोपायच्या. परंतु तेथे त्यांनी कधी एकटे खाल्ले नाही. स्टेशनवरच्या सगळ्या भिकाऱ्यांना बोलावून त्या मिळालेल्या अन्नाचा काला करायच्या आणि मग सर्व भिकारी एकत्र बसून जेवायचे. त्यांनी २१ वर्षांच्या ताईंना संरक्षण दिले. दोन दिवस काहीच भीक मिळाली नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांना तेथे कायम राहता येणार नाही. म्हणून शेवटी सिंधुताईंनी स्मशान गाठले.

अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी सिंधुताई यांनी ममता बाल सदन संस्थेची स्थापना केली. सन १९९४ साली पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावात ही संस्था सुरू झाली. आपली कन्या ममता हिला दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी सेवासदन येथे दाखल केले आणि त्यांनी इतर अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला. तेथे लहान मुलांना सर्व शिक्षण दिले जाऊ लागले. त्यांच्या भोजन, कपडे अन्य सुविधा यांची उपलब्धता संस्थेकडून केली जात असे. शिक्षण पूर्ण झाल्यावर येथील मुले आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील यासाठीही त्यांना मार्गदर्शन दिले जाते. आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्यावर या युवक युवतींना योग्य जोडीदार शोधून देणे आणि त्यांच्या विवाहाचे आयोजन करणे हे कार्यही संस्थेकडूनच केले जाते. अशी सुमारे १०५० मुले या संस्थेत राहिलेली आहेत. त्यांनी अन्य समकक्ष संस्थाही स्थापन केलेल्या आहेत त्या अशा– बाल निकेतन हडपसर, पुणे. सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, चिखलदरा. अभिमान बाल भवन, वर्धा. गोपिका गाईरक्षण केंद्र, वर्धा. ममता बाल सदन, सासवड. सप्तसिंधु महिला आधार बालसंगोपन व शिक्षणसंस्था, पुणे. आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी आपल्या संस्थेच्या प्रचारासाठी आणि कार्यासाठी निधी संकलन करण्याच्या हेतूने प्रदेशदौरे केले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्यांनी आपल्या बोलण्याने आणि काव्याने समाजाला प्रभावित केले आहे. परदेशी अनुदान मिळणे सोपे जावे या हेतूने त्यांनी मदर ग्लोबल फाउंडेशन संस्थेची स्थापना केली आहे. त्यांना महानुभाव पंथाचा अनुग्रह होता. महानुभाव पंथाच्या नियमाप्रमाणे त्यांना भुमीडाग देण्यात आला.

अशातच सिंधुताईंवर दि.२५ नोव्हेंबर २०२१ रोजी हॉस्पिटलमध्ये डायफ्रामॅटिक हर्नियाची शस्त्रक्रिया झाली. त्यांच्यावर शस्त्रक्रियोत्तर काळजी घेण्यात येत होती. पाच वर्षांहून अधिक काळ ग्रस्त असलेल्या डायफ्रामॅटिक हर्नियामुळे त्यांचे डाव्या बाजुचे फुफ्फूस व्यवस्थितरित्या कार्य करीत नव्हते. शस्त्रक्रियेनंतर त्यांची प्रकृती थोडी बरी झाली होती. तथापि, पाच दिवसांपूर्वी त्यांना फुफ्फुसाचा संसर्ग वाढल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडू लागली, त्यामुळे त्यांना व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले होते. दरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि दि.०४ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी ८ वाजून १० मिनीटांनी त्यांचे निधन झाले. पुणे येथील गॅलक्सी केर या दवाखान्यामध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला.


!! स्मृतिदिनी त्यांच्या ममत्वाला व कार्यकर्तृत्वाला मानाचा मुजरा !!

**बापू– श्रीकृष्णदास निरंकारी.**
**द्वारा– प. पू. गुरुदेव हरदेव कृपा निवास. रामनगर, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.**

# मूल तालुक्यातील ग्रामपंचायतींचे ऑनलाइन कामकाज ठप्प..!

**मूल । प्रतिनिधी**

ग्रामपंचायतींमधील डाटा एंट्री व ऑनलाइन कामकाज करण्यासाठी खासगी कंपनीचे संगणक परिचालक हे कंत्राटी कर्मचारी ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा मिळावा,यासाठी संपावर गेले आहेत.त्यामुळे ग्रामीण भागातील ऑनलाइन स्वरूपाच्या कामांना ब्रेक लागला असून, ग्रामपंचायतींचा ऑनलाइन कारभार बंद होऊन नोंव्हेंबर,डिसेंबर महिना गेला आता नविन वर्ष जानेवारी २०२४ लागले तरी सूध्दा तोडगा न निघाल्याने कामकाज ठप्पच आहे. मारोडा,र ाजोली, चिमढा, कांतापेठ, हळदी, केळझर, सुशीदाबगाव, राजगड ,भेजगाव, बेंबाळ, ताडाळा, नांदगाव, चिरोली, डोंगरगाव, गांगलवाडी, चितेगाव, मरेगाव, कोंसबी, जानाळा, टोलेवाही,पिपिरी दिक्षीत,चिचाळा,नवेगाव भूजला,बोरचांदली, खालवसपेठ,जुनासूर्ला,चांदापूर, फिस्कूटी, विरई,गडीसूर्लासंगणक परिचालक ग्रामपंचायत कार्यालयांमधून ग्रामपंचायती



व सामान्य नागरिकांना ऑनलाईन सेवा देण्याचे काम करतात.सध्याराज्य सरकार ग्रामपंचायतींना ऑनलाईन सेवा देण्याचे काम सीएससी या कंपनीच्या माध्यमातून करीत आहे. या कंपनीने प्रत्येक गावोगावी संगणक परिचालकांची नियुक्ती केली असून त्यांना दरमहा ६९३० रुपये मानधन दिले जाते.त्यात या कंपनीकडून वेळेवर मानधन मिळत नसल्याच्याही या संगणक परिचालकांच्या तक्रारी आहेत.दरम्यान ग्रामपंचायतींचे ऑनलाईन कामे करूनही केवल ६९३० रुपये हे अत्यंत तुटपुंजे मानधन मिळते.राज्य सरकारने आता ग्रामपंचायतींचा कारभार पूर्णपणे ऑनलाईन करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला असून ई ग्रामस्वराज्य पोर्टलनंतर आता मेरी पंचायत हे नवीन प सुरू केले आहे.या परिस्थितीत ग्रामपंचायतीमध्ये ऑनलाईन काम करणे व डाटा एंट्रीचे काम करण्यासाठी कायमस्वरुपी कर्मचारी आवश्यक झाले आहे. यामुळे सरकारने विद्यमान संगणक परिचालकांना कर्मचारी दर्जा देऊन त्यांना किमान वेतन मिळावे अशी प्रमुख मागणीसाठी राज्यातील सर्व संगणक परिचालक संपावर गेले आहेत.ग्रामपंचायत स्तरावर नागरिकांना विविध योजना ऑनलाइन पद्धतीने देण्याचे सरकारचे धोरण आहे. त्यामुळे ग्रामपंचायत पातळीवर संगणक परिचालक पदाची निर्मिती करून त्यांना कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून सामावून घेण्याची या संगणक परिचालकांची मागणी आहे.

# ओबीसी मोर्चाने केली सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**पुलगाव । प्रतिनिधी**

भाजपा ओबीसी मोर्चा पुलगाव शहर यांच्या वतीने दि.३ जानेवारीला क्रांतिज्योती सावित्री बाई फुले यांच्या जयंती साजरी करण्यात आली.




क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती व महिला मुक्ती दिनाच्या निमित्ताने राणी लक्ष्मीबाई प्राथमिक शाळा पुलगाव येथे माजी नगराध्यक्षा सौ शितल गाते यांच्या अध्यक्षतेखाली व भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा चे प्रदेश सचिव शकील खान यांच्या प्रमुख उपस्थितीत व ओबीसी मोर्चा पुलगाव शहर अध्यक्ष अनिल लेकुरवाळे यांच्या नेतृत्वात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून मुख्याध्यापिका मीना उमरे ,सुनिता तागडे,व सतीश राखुंडे सहाय्यक शिक्षक तसेच सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत कुमारी त्रिशा तागडे या छोट्याश्या चिमुकलीचा सत्कार करण्यात आला.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनचरित्रावर विचार व्यक्त केले.यानंतर विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापक समिती अध्यक्ष प्रांजली पाटील,भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष संदीप बोरकुटे, जिल्हा सह .संपर्कप्रमुख अश्विनी बमनोटे ,जिल्हा सचिव राजेश गुप्ता ,जिल्हा सदस्य विजय ढगे ,पुलगाव शहर महामंत्री सचिन चौधरी, प्रफुल मंथनवार, उपाध्यक्ष रामकृष्ण दरगुडे ,गणेश पाटणे ,अमोल वाटकर, ओबीसी मोर्चा पुलगाव शहर महिला संयोजिका प्रगती महाजन ,सचिव प्रिती तरोणे, वैशाली वरवाडे, अर्चना वरवाडे,जयश्री बांगरे, उपाध्यक्ष निता ढगे ,भाजपा भटके विमुक्त आघाडी जिल्हा उपाध्यक्ष शंकर भानारकर, मोरेश्वरराव नंदनवार सह मोठ्या संख्येत बंधू भगिनी या कार्यक्रमाला उपस्थित होते.या कार्यक्रमाचे संचालन सतीश राखुंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन विजयराव ढगे यांनी केले.

# विहिरीत आढळला अनोळखी इसमाचा मृतदेह

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील वाठोडा या गावातील प्रशांत विठ्ठल सायंकार यांच्या मालकीच्या शेतातील विहिरीत एका आनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला.

प्रशांत विठ्ठलरावं सायंकार हे नेहमी प्रमाणे आपल्या शेतात सकाळी गेले असता सकाळी ६ च्या सुमारास एका अनोळखी इसमाचा मृतदेह त्यांच्या विहिरीत तरंगताना त्यांना दिसला त्यांनी लगेच शेगावं पोलीस स्टेशन ला माहिती दिली. माहित दिल्या बरोबर शेगावं पोलीस स्टेशन चे ठाणेदार हे घटनास्थळी दाखल होऊन मृतदेह बाहेर काढला. हा इसम अनोळखी असल्यामुळे त्याची ओळख पटविणे चालू आहे. समोरील तपास शेगावं पोलीस स्टेशन चे ठाणेदार आणी त्याचे सहकारी करत आहे.

# आव्हान शिबिरातून साहसी विद्यार्थी तयार होऊन त्याचा उपयोग समाजासाठी होईल-विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार

## राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर आव्हान २०२३ चा समारोप

**गडचिरोली । प्रतिनिधी**

आपत्ती निवारणासाठी आधुनिक तंत्रज्ञान आले आहे, मात्र हे तंत्रज्ञान वापरण्यापूर्वी तुमच्यासारख्या प्रशिक्षित विद्यार्थ्यांची गरज पडते.गडचिरोली जिल्हा वनसंपदा आणि खनिजांनी श्रीमंत आहे अनेक शहरात पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे, मात्र गडचिरोली मध्ये शुध्द ऑक्सिजन आहे.येथील गोंड संस्कृती सर्वात प्राचीन संस्कृती आहे.गडचिरोली जिल्ह्यातील लोकांची इथल्या मातीशी आणि जंगलाशी आपुलकी आहे.याचा आम्हाला अभिमान आहे.या सांस्कृतीशी एकरूप होण्यासाठी तुम्ही आलात म्हणून तुमचं कौतुक,गडचिरोली मध्ये अधिकारी, कर्मचाऱ्यांना शिक्षा म्हणून पाठविले जाते. गडचिरोली मध्ये नोकरदार यायला बघत नाही. मात्र आल्यावर गडचिरोली सोडून जात नाही ही या मातीची किमया आहे.प्रामाणिक आणि प्रेमळ माणसे इथे आहे. मी कुठेही असलो तरी मला आनंद गडचिरोली मध्ये मिळतो.राज्याच्या कानाकोपऱ्यातुन विद्यार्थी इथे आले आहेत. नक्कीच गडचिरोली शहर नावारूपाला येण्यास यामुळे मदत होईल, असा विश्वास विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला.राज्यस्तरीय आपत्ती निवारण शिबिर आव्हान२०२३ च्या समारोप समारंभा प्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते . यावेळी मंचावर गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे ,प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण,फाईव्ह एन. डी. आर. एफ.पुणेचे असिस्टंट कमांडन्ट, निखिल मुधोळकर, अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान डॉ.अनिल चिताडे , अधिष्ठाता मानव विज्ञान विद्याशाखा डॉ. चंद्रमौली,वित्त व लेखाअधिकारी भास्कर पठारे, निरीक्षक समिती सदस्य राजभवन डॉ. नितीनप्रभु तेंडुलकर ,गोंडवाना विद्यापीठाचे रासेयो संचालक तथा आव्हान २०२३ चे समन्वयक डॉ. श्याम खंडारे , व्यवस्थापन परिषदेचे सदस्य विवेक गोर्लावार,नंदाजी सातपुते, रंजना लाड, गोंडवाना विद्यापीठाचे परीक्षा संचालक डॉ. दिनेश नरोटे आदी उपस्थित होते. याप्रसंगी विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते गोंडवाना रेडिओ या नव्या इंटरनेट रेडीओ चे उद्घाटन करण्यात आले.फाईव्ह एन. डी. आर. एफ.पुणेचे असिस्टंट कमांडन्ट, निखिल मुधोळकर,निरीक्षक समिती सदस्य राजभवन डॉ. नितीनप्रभु तेंडुलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे,अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले, आव्हान शिबिरासाठी पुरेशा सोयीसुविधा नसतानाही आमच्या चमूने शिबिर यशस्वी करून दाखवले . मला माझ्या संपूर्ण टीमचे कौतुक आहे . कुठेतरी कमी जास्त असतेच. आव्हान



शिबिरापासून विद्यार्थानी मी माझ्या समाजातील लोकांना आपत्तीपासून वाचवले पाहिजे. समाजातील लोकांच्या कामात मला कस येता येईल. असा बोध घेतला पाहिजे. महाराष्ट्रातील इतर जिल्हा सारखाच गडचिरोली जिल्हा आहे पुन्हा पुन्हा अनेक कार्यक्रमासाठी गडचिरोली जिल्हा आपल्याला आवाज देत राहील आपण त्याला साद घालत राहा असे ते म्हणाले.आव्हान २०२३ चे प्रशिक्षणार्थी कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव सौरभ सुनिल माळी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आर्या धनविजे,मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थी विवेक परमार, रायगड जिल्हा संघनायक डॉ.अनिल झेंडे, नांदेड विद्यापीठाच्या संघनायिका डॉ.कल्पना जाधव, संघनायिका पुणे विद्यापीठ ज्योती मने, विद्यार्थी मुंबई विद्यापीठ विवेक परमार यांनी मनोगत व्यक्त केले. आव्हान२०२३ चे अहवाल वाचन गोंडवाना विद्यापीठाचे रासेयो संचालक तसेच आव्हान २०२३चे समन्वयक डॉ. श्याम खंडारे यांनी केले. केवळ रामजी हरडे महाविद्यालयाची विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त रासेयो स्वयंसेवक जान्हवी पेद्दीवार आणि रासेयो विभागीय समन्वयक डॉ. पवन नाईक यांचा विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे आभार गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांनी तर संचालन मराठीचे स. प्रा. डॉ. नीलकंठ नरवाडे यांनी केले. पुढील आव्हान शिबिर अमरावती येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात होणार असून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे रासेयो संचालक डॉ. संतोष येवले यांच्याकडे आव्हान ध्वज सुपूर्द करण्यात आला.या दहा दिवसीय आव्हान शिबिरासाठी आव्हान समन्वयक डॉ. प्रिया गेडाम यांच्यासह सर्व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### विद्यार्थ्यांना पुरस्कार वितरण

सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय स्वयंसेवक पुरस्कार , चेतन गौरी भारत, मुंबई विद्यापीठ ,ओम मोहिते, हैदराबाद सेंटर नॅशनल कॉलेजिएट विद्यापीठ मुंबई ,सर्वोत्कृष्ट रासेयो स्वयंसेवीका पुरस्कार अनुश्री निलेश घरत, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली ,सर्वोत्कृष्ट रासेयो स्वयंसेवक पुरस्कार, मयुरी पवार सावित्रीबाई फुले युनिव्हर्सिटी, पुणे सर्वोत्कृष्ट रासेयो संघनायक पुरस्कार स्वप्निल कुमार साहेबराव काळे ,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती,सर्वोत्कृष्ट रासेयो संघ नायिका पुरस्कार, डॉ. ताहीरा मीर, कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र जळगाव विद्यापीठ, सर्वोत्कृष्ट रासेयो संघ रॅली भंडारा जिल्हा , राष्ट्रसंथ तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, उत्कृष्ट रासेयो संघ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

# सावित्रीमाई ने खुली केली आपल्यासाठी शिक्षणाची दारे : काँग्रेस नेते दिनेश चोखारे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सावित्रीमाई यांनी आपल्यासाठी शिक्षणाची दारे केली असून सावित्रीमाई यांच्या विचारांवर आधारित आपण समाजात परिवर्तन घडवून आणावे असे काँग्रेस नेते दिनेश चोखारे यांनी सांगितले.जि.प.उच्च प्राथ.शाळा चिचपल्ली येथे आज दि.३ जानेवारी २०२४ रोजी क्रांतिज्योती सावित्रीआई फुले यांची जयंती बालिका दिन मोठ्या थाटा-माटात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमात काँग्रेस नेते दिनेश चोखारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रारंभी दिनेश चोखारे यांचे शुभ हस्ते चंदन उंचेकर सरपंच, मविजय वनकर मु.अ.तथा केंद्रप्रमुख, रवी सुत्रपवार सदस्य, दिपक रामटेके अध्यक्ष शा.व्य.स पुष्पा गेडाम सदस्या,प्रसून दुर्योधन, मालाबाई दुर्योधन तथा सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत सावित्रीआईंच्या प्रतिमेस दिप प्रज्वलीत करुन माल्यार्पण करण्यात आले.

यावेळी दिनेश चोखारे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव करून सांगितले की, सावित्रीमाई यांनी आपल्यासाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांनी स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे आज




महिलांना शिक्षण घेण्याची संधी मिळाली आहे. सावित्रीमाई यांच्या विचारांवर आधारित आपण समाजात परिवर्तन घडवून आणावे. स्त्री-पुरुष समानतेसाठी आपण प्रयत्न करावेत. त्यांनी विद्यार्थ्यांना सावित्रीमाई यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले. बालिका दिनाचे औचित्य साधून माजी बांधकाम सभापती म

दिनेशचोखारे यांचे वतीने शाळेतील सर्व मुला-मुलींना नोटबूक तथा बिस्कीट वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक विजय वनकर यांनी केले.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित मनोगत सादर केले.कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन सोनाक्षी निमगडे तर आभार कु.नव्या निमगडे या विद्यार्थीनीनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अर्चना येरणे मॅडम, लीना आवळे मडम, रेवानंद मेश्राम, तथागत खोब्रागडे सर,मिनल दोडके, भुजंग रामटेके तथा विद्यार्थ्यांचे मंत्रीमडळांने अथक परिश्रम घेतले.सर्व विद्यार्थ्यांनी सुंदर सुंदर गिते आणि भाषण दिले.गावातील महिलांची सुद्धा भाषणे, संगीत खुर्ची, लिंबू चमचा स्पर्धा घेण्यात आली.जि.प.शाळेच्या विद्यार्थीनीनी सुंदरसे स्वागतगीत गाऊन गाऊन मंत्रमुग्ध केले.आजच्या रंगारंग कार्यक्रमाचे उद्घाटक दिनेश चोखारे यांनी शाळेला विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आवश्यक म्याट चटई लवकरच देण्याची घोषणा केली.

# वाळू निर्गती धोरणानुसारच विक्रीला परवानगी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सन २०२२ -२३ मध्ये चंद्रपुर जिल्ह्यातील एकूण ४० रेतीघाटाचा लिलाव माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये करण्यात आला होता. उक्त ४० रेतीघाटापैकी ३८ रेतीघाटाचा यशस्वीरित्या लिलाव होऊन सर्व रेतीघाटाचा करारनामा करून सदर रेतीघाट संबधित लिलावधारकांचा ताब्यात देण्यात आला. रेतीघाटांना राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन समितीने २८ फेब्रुवारी २०२३ पर्यंत पर्यावरण मान्यता दिली होती. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने पर्यावरण मान्यतेच्या पुर्ण प्रमाणीकरण ( एर्पींळीपाशपीं उश्रशरीरपलश ऐंशपीळेप) करिता राज्यस्तरीय पर्यावरण समितीकडे अर्ज सादर केला व समितीने त्यावर पर्यावरण मान्यता पुर्नप्रमाणीकरण करून वाढीव मुदत ३० सप्टेंबर २०२३ पर्यत देण्याबाबतचा आदेश दिला.



लिलावात गेलेल्या ३८ रेतीघाट धारकांना पर्यावरण मान्यताची पुढील मुदतवाढीचा लेखी आदेश प्राप्त होईपर्यत उत्खनन बंद ठेवण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून लेखी आदेश २७ फेब्रुवारी २०२३ रोजी निर्गमीत करण्यात आले होते. तथापी काही लिलावधारकांनी कमी कालावधी मिळत असल्याने लिलावातील रक्कम परत करणेबाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपुर यांच्याकडे याचिका दाखल केली. राज्य पर्यावरण प्राधिकरणने पर्यावरण मान्यताची मुदत ३० सप्टेंबर २०२३ पर्यत वाढवून दिल्यानंतर उत्खनन चा कालावधी १० जुन २०२३ पर्यत लिलावधारकांना देण्यात आला होता व साठा केलेल्या रेतीडेपोमधून विक्रीची परवानगी ३० सप्टेंबर २०२३ पर्यत देण्यात आली होती. यानंतर नंतर रेतीडेपो मधून विक्री करण्यास मनाई करण्यात आली होती व त्या अनुषंगाने पत्र निर्गमीत करण्यात आल.लिलावात गेलेल्या ३८ रेतीडेपो मधून २४ रेतीडेपो मध्ये रेतीसाठा शिल्लक असल्याची माहिती सादर करून लिलावधारकांनी शासनाचे वाळु / रेती निर्गती धोरण दि. २८ जानेवारी २०२२ मधील प्रकरण सहा परिच्छेद खख उपपरिच्छेद (क)नुसार रेतीडेपो मधून रेतीविक्रीची परवानगी मिळण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वितरक परवाना करिता अर्ज सादर केले. सन २०२३ -२४ मध्ये पर्यावरण मान्यता करिता सादर केलेले रेतीघाटाचा प्रस्तावास होत असलेला कालावधी विचारात घेऊन व ३० सप्टेंबर २०२३ पासून स्थानिक लोकांना घरबांधकाम / शासकीय बांधकाम व खाजगी कामाकरीता रेती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने रेतीडेपो मध्ये असलेल्या शिल्लक साठा विक्री करण्यास जिल्हा प्रशासनाने ३१ डिसेंबर २०२३ पर्यत मुदत दिली आहे. सदर निर्णय हे लोकांना रेती उपलब्ध व्हावा व लिलावधारकांनी संपूर्ण लिलावाची रक्कम भरून प्राप्त केलेली रेती नैसर्गिक न्यायतत्वानुसार विक्री करण्याकरीता प्राप्त व्हावी, याकरीता देण्यात आली आहे व यामध्ये कुठेही अनियमितता झालेली नाही, असे जिल्हा खनीकर्म अधिकारी सुरेश नैताम यांनी कळविले आहे.

# बल्लारपूर पब्लिक स्कूल, मूल येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन





**मूल । प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ मूल द्वारा संचालीत बल्लारपूर पब्लिक स्कूल, मूल येथे आनंद मेला, फॅमिली फंडे व नववर्षाचे स्वागत या कार्यक्रमाच्या आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिल वैरागडे सचिव शिक्षण प्रसारक मंडळ मूल तसेच कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून वर्षा पिपरे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती मुल तसेच शाळेचे प्राचार्य विनोद बोलीवर व प्रमुख पाहुणे म्हणून भास्कर अवताडे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त पालक व विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी सहभाग घेतला व पालकांसाठी विविध प्रकारच्या खेळाची स्पर्धा घेण्यात आली तसेच नृत्य स्पर्धा व गीत गायन स्पर्धा घेण्यात आली तसेच शाळेचे प्राचार्य विनोद बोलीवार आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना तसेच पालकांना खेळाडूवृत्ती निर्माण करून विविध स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा असे आपल्या भाषणातून सांगण्यात आले तसेच कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून वर्षा पिपरी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती मुल यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना व पालकांना योग्य तसे मोलाचे मार्गदर्शन केले तसेच क्रीडा शिक्षक स्वप्निल नवघरे यांनी खेळाबद्दल ची माहिती पालकांना सांगण्यात आले आणि स्पर्धा घेण्यासाठी सहकार्य केले तसेच सर्व शिक्षक शिक्षकांनी स्पर्धेमध्ये सहभागी पालक विद्यार्थी यांचे परीक्षण केले तसेच स्वागत गीत शाळेतील शिक्षिका यांनी सादर केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व तोषी जयस्वाल व दुर्गा कोटगले व रुहीना सय्यद यांनी केले व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दर्शना शेलेकर यांनी केले कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षक शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थिनी अथक परिश्रम घेतले कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम या गीताने करण्यात आली.

# अहेतेशाम अली यांनी शाळेतील विद्यार्थिनी सोबत साजरी केली सावित्रीबाई फुले जयंती

**वरोरा । प्रतिनिधी**

थोर समाजसुधारक, शिक्षणसेविका महिला हक्कांच्या अग्रणी, कवयित्री क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा जयंतीदिनी निमीत्य वरोरा येथील ज्योतिबा फुले चौक,येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. सर्वांनी त्यांचा प्रतिमेवर माल्यार्पण केले.

ज्यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली अशा शिक्षणसेविका सावित्रीबाई फुले यांची जयंती शाळेतील विद्यार्थीनिंना सोबत घेऊन अहतेशाम अली यांनी साजरी केली.या प्रसंगी जय ज्योती,जय क्रांती म्हणत सर्वांनी जयघोष केला. या वेळी नागरिकांना मिठाई वाटप करण्यात आली. या कार्यक्रमात अहेतेशाम अली अल्पसंख्याक आघाडी प्रदेश उपाध्यक्ष भाजप तथा माजी नगराध्यक्ष न.प.वरोरा यांचा सोबत राजु डोंगरे,



विठ्ठल बोबडे,प्रकाश बनकर,विलास सपाटे, गोपळ निंबाळकर,संतोष गोठफोडे, पुजरांम डोंगरे, पिंपडशेंडे,केशवराव लोते, प्रमोद डोंगरे,रमेश लांजेवार,महेश भिवदरे,दशरथ शेंडे,अमित माडवगडे,प्रशांत भिवदरे,शेखर इंगळे,सुभाष राऊत,संजय नरोले,विनोद ढाकुलकर,गणेश लांजेकर,विलास दरापुरकर,समाज बांधव,शाळेतील विद्यार्थिनी आणि इतर नागरीक या प्रसंगी उपस्थित होते.

# कन्येचा जन्मदर वाढविण्यासाठी देवाडे कन्या परीवार सहयोग प्रतिष्ठानचा उपक्रम

## आ.समिर कुणावार यांचे हस्ते लोकार्पण

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

समाजात कन्येचा जन्मदर वाढावा, त्या उद्याच्या सक्षम नागरीक व्हाव्यात, महिला सक्षमीकरणाच्या हेतूने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाचे आज विधानसभा क्षेत्राचे आमदार समिर कुणावार याचे शुभहस्ते लोकार्पण करण्यात आले.

सदर उपक्रमाचे आयोजन नजीकच्या बोरगांव (नांदगाव) येथील अशोक देवाडे कन्या परिवार सहयोग प्रतिष्ठानाचेवतीने आ. कुणावार यांचे जन्मदिवसाचे औचित्य साधून करण्यात आले.या उपक्रमाचे माध्यमातून गरजू माता, भगिनींना काही जीवनावश्यक वस्तूंचे वितरणसुद्धा करण्यात येणार असून येथील ग्रामीण भागात मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अशोक देवाडे यांनी दिली. आ. कुणावार यांनी या लोकोपयोगी उपक्रमास शुभेच्छा व्यक्त करीत संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.उपरोक्त लोकार्पण सोहळ्याचेवेळी लोकप्रिय आमदार समीर कुणावार यांचेसह अशोक देवाडे, भाजपा शहर अध्यक्ष भूषण पिसे ,रामदासजी गेडेकर,गोपालजी ठवरी, रविकांत डोळसकर,शरद गौळकर,चंदुभाऊ मावळे,गणेश उगे ईत्यादी मान्यवर उपस्थित होते.



# मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३४ व्या अधिवेशन अध्यक्षपदी डॉ.राजेंद्र नाईकवाडे यांची निवड







**नागपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली मराठी प्राध्यापक परिषदेचे ३४ वे अधिवेशन येत्या १९ व २० जानेवारी २०२४ ला डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय, नागपूर येथे होत असून या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध साहित्यिक-समीक्षक, रा.तु.म.नागपूर विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष आणि श्री बिंझाणी नगर महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. प्राध्यापक परिषदेच्या अलीकडेच झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निवडीनिमित्त परिषदेचे अध्यक्ष व इतर पदाधिका-यानी आज दि. २ जानेवारी २०२४ ला डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सपत्नीक सत्कार केला. नागपूर व गोंडवाना विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेची आजवर ३३ अधिवेशने संपन्न झाली असून १९६८ मध्ये वणी येथे झालेल्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. मा.गो.देशमुख हे होते. त्यानंतर सातत्याने दरवर्षी अधिवेशनांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये आजवर भ.श्री. पंडित, श्री.मा.कुळकर्णी, डॉ. अ.ना. देशपांडे, डॉ. द.भि.कुलकर्णी, डॉ. मदन कुलकर्णी, डॉ. वि.स.जोग, आचार्य अ. द. वेलणकर, डॉ. अक्षयकुमार काळे आदि अनेक समीक्षक - प्राध्यापकांनी अधिवेशनाची अध्यक्षपदे भूषविली आहेत. यावर्षी १९ व २० जानेवारी २०२४ ला नागपूरच्या पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालयात होणा-या द्विदिवसीय अधिवेशनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार करण्यात आला त्याप्रसंगी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड, सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे, मार्गदर्शक डॉ. सत्यवान मेश्राम, कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. हिराजी बनपुरकर, मागील वर्षीचे अधिवेशनाध्यक्ष प्रा. श्रीकांत नाकाडे, कोषाध्यक्ष डॉ. सोपानदेव पिसे, ३४ व्या अधिवेशनाच्या मुख्य संयोजक डॉ. मनीषा नागपुरे, सहसंयोजक डॉ. अमृता डोर्लीकर, नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख व परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. शैलेंद्र लेंडे, उपाध्यक्ष डॉ. सुदर्शन दिवसे व डॉ. अजय कुळकर्णी, सहसचिव डॉ. संगीता खुरद, प्रसिद्धी प्रमुख डॉ. यशवंत घुमे, डॉ. विजय राऊत, डॉ. प्रवीण घारपुरे, डॉ. अंजली पांडे, डॉ. रामलाल चौधरी, डॉ. राखी जाधव, डॉ. नरेंद्र घरत, डॉ. प्रशांत सूर्यवंशी हे सर्व परिषदेच्या कार्यकारिणीचे पदाधिकारी, तसेच राजेंद्र यांच्या पत्नी सौ. सीमा आणि मोठे बंधू प्रकाश नाईकवाडे उपस्थित होते.

## आंतर महाविद्यालयीन हँडबॉल आणि रस्सीखेच स्पर्धे मध्ये आनंद निकेतन महाविद्यालयाचा संघ विजयी





**वरोरा । प्रतिनिधी**

दि. १८ व १९ डिसेंबर २०२३ ला गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली द्वारा चिंतामणी महाविद्यालय, पोंभुर्णा येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धेमध्ये आनंद निकेतन महाविद्यालयाच्या महिला संघाने आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावून विजेतेपद आपल्या नावी केले.तर पुरुष संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. या संपूर्ण संघाला प्रशिक्षक म्हणून प्रधिक्षण देण्याचे कार्य मयुर भोयर यांनी केले.त्याचप्रमाणे ३ जानेवारी २०२४ ला चिंतामणी महाविद्यालय, पोंभूर्णा येथे आयोजित करण्यात आलेल्या रस्सीखेच स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या पुरुष आणि महिला संघाने द्वितीय क्रमांक पटकाविला. संघामधील सहभागी सर्व खेळाडूंनी आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत हा विजय महाविद्यालयाला मिळवून दिला.या संपूर्ण विजयी संघातील खेळाडूंचे तसेच प्रशिक्षकांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मृणाल काळे, उपप्राचार्या राधा सवाने आणि शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग प्रमुख प्रा. तानाजी बायस्कर यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचाली साठी शुभेच्या दिल्या.

## सावित्रीबाई फुले यांची जयंती



**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक सरस्वती नर्सिंग स्कूल गुंजखेडा, येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी व्यासपीठावर आई सरस्वती बहुउद्देशीय महिला विकास संस्थेचे संस्थापक डॉ.मिलिंद ठोंबरे संस्थाध्यक्ष भारती मिलिंद ठोंबरे उपस्थित होत्या. सर्वप्रथम दिपप्रज्वलन करून प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले, यावेळी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जिवनावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला.मुलींना शिक्षणाचा समान अधिकार मिळावा याकरिता केलेलं प्रयत्न, प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी केलेले उल्लेखनीय कामगिरी,तसेच आज हि स्त्रीयावर होणारे अत्याचार तसेच बदलती सामाजिक परिस्थिती यावर आपल्या अध्यक्षीय भाषणातून मत मांडले, ह्यावेळी सरस्वती नर्सिंग स्कूल मधिल सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## घुग्घुस शहरातील सर्व धार्मिक स्थळाच्या ठिकाणी सीसीटीवी कॅमेरे लावा-किरण बोढे

**घुग्घुस । प्रतिनिधी**

शहरातील सर्व धार्मिक स्थळ आणि बगीचाच्या ठिकाणी सीसीटीवी कॅमेरा लावा अशी मागणी प्रयास सखी मंच घुग्घुसच्या अध्यक्षा किरण बोढे यांनी निवेदनातून केली आहे.

घुग्घुस शहरात नागरीकांसाठी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या माध्यमातून आणि माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या पाठपुराव्यातून दहा बगीचांची निर्मिती करण्यात आली. तसेच शहरामध्ये विविध धार्मिक स्थळे आहे. भारतीय संस्कृतीत धार्मिक स्थळाना पवित्र माणल्या जाते. परंतु समाजकंटक धार्मिक स्थळाची विटंबना करतात. तसेच बगीचाच्या साहित्याची तोडफोड करून चोरीस जाते.या सर्वावर आळा घालण्यासाठी



प्रयास सखी मंच घुग्घुसच्या अध्यक्षा किरण बोढे यांनी शिष्टमंडळासह नगर परिषद कार्यालयात अधिकाऱ्यांची भेट घेतली व चर्चा करून मागणीचे निवेदन दिले.यावेळी प्रयास सखी मंच घुग्घुसच्या अध्यक्षा किरण बोढे, भाजपाच्या सुषमा सावे, अमीना बेगम, पुष्पा रामटेके, माधुरी चोखांद्रे, सुधा उरकुडे, सुनीता घिवे, शोभा माकोडे, शुभश्री किन्हेकर, विमल इंगोले, प्रियांका मोहजे, पपीता धोंगळे, अश्विनी कपाटे, सुनंदा लिहीतकर, स्वाती गंगाधरे व मोठया संख्येत महिला उपस्थित होत्या.

## माजी जि.प. अध्यक्ष अजय कंकडालवार यांच्या हस्ते कबड्डी-व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन

**एटापल्ली । प्रतिनिधी**

तालुक्यातील नारानूर व रेंगावाही येथील जय महादाखंडी क्रीडा मंडळ नारानूर-रेंगावाही यांच्या सौजन्याने भव्य ग्रामीण कबड्डी-व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन अहेरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, काँग्रेसचे नेते तथा माजी जि.प. अध्यक्ष अजय कंकडालवार यांच्या हस्ते करण्यात आले.



स्पर्धेसाठी प्रथम पुरस्कार माजी जि.प. अध्यक्ष अजय कंकडालवार यांच्याकडून देण्यात येणार आहे. अजय कंकडालवार यांचे गावात आगमन होताच नागरिकांनी आदिवासी रेला नृत्य करत ढोल तशाने जंगी स्वागत केले. कंकडालवार यांनी प्रथम सप्तरंगी ध्वजाचे ध्वजारोहन करून आदिवासींचे जननायक बिरसा मुंडा आणि स्त्री शिक्षणाचे जननी-क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पअर्पण करून अभिवादन केले.यावेळी काँग्रेसचे नेते व सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षक हनमंतू मडावी, आविसं तालुका अध्यक्ष नंदूभाऊ मट्टामी, आविसं तालुका सचिव प्रज्वल नागूलवार, ग्रामपंचायत सदस्य रमेश वैरागडे, मरपल्ली ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच कार्तिक तोगम, स्वप्नील मडावी, चिंटू आत्रामसह आविसं-काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच गावातील नागरिक- मंडळाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# श्री रामाचा रथ घेऊन कारसेवक खा.सुनिल मेंढे निघाले यात्रेला

## लोकसभा मतदारसंघात भ्रमंती २ लाख पणत्यांचे होणार वाटप

**भंडारा । प्रतिनिधी**

३५ वर्षांपूर्वी कारसेवक म्हणून प्रभू श्रीरामांची सेवा करण्याची संधी मिळाली. तेव्हापासून मनात अयोध्येतील श्री राम मंदिराचा ध्यास लागून होता. तो क्षण जवळ आला असताना पुन्हा एकदा, कारसेवक असलेल्या खासदार सुनील मेंढे यांनी रामासाठी अनोख्या पद्धतीने सेवा देण्याचा निर्णय घेत, संपूर्ण लोकसभा मतदारसंघात श्री राम रथयात्रा काढण्याचा निर्धार जाहीर करीत आज २ जानेवारीपासून या श्री राम रथयात्रेला सुरुवात झाली. पवनी तालुक्यातील अड्याळ येथून निघालेला श्रीरामांचा रथ आता २१ तारखेलाच थांबणार आहे. बजरंग दलाचा निष्ठावान कार्यकर्ता म्हणून दोन्ही कारसेवांमध्ये सहभागी होत प्रभू श्रीरामांच्या चरणी आपली सेवा अर्पण केली. एक कारसेवक म्हणून काही संकल्पही त्यावेळी आजचे खासदार सुनील मेंढे यांच्याकडून केले गेले होते. असंख्य कारसेवकांच्या बलिदानातून, विश्वास आणि रामाप्रती असलेल्या प्रचंड श्रद्धेतून आज राम मंदिर पूर्णत्वास जाऊन प्रत्यक्षात प्रभू श्री रामचंद्र २२ जानेवारी रोजी भव्य दिव्य अशा मंदिरात विराजमान होत आहेत. स्वप्नपूर्तीच्या या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ३५ वर्षांपूर्वीचा खासदारांमधील कारसेवक स्वस्थ कसा बसू शकतो. श्रीरामा प्रती असलेल्या अपार श्रद्धेतून पुन्हा एकदा खासदार सुनील मेंढे यांनी अनोख्या पद्धतीने प्रभुंची सेवा करण्याचा निर्णय घेत संपूर्ण लोकसभा मतदारसंघात श्रीराम रथयात्रा काढण्याचा निर्धार जाहीर केला.



भंडारा गोंदिया जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये ही श्री राम रथयात्रा भ्रमण करणार असून या यात्रेतून खासदार सुनील मेंढे गावागावात जाऊन नागरिकांना २२ जानेवारी रोजी प्रभुंच्या स्वागतासाठी आणि दिवाळी साजरी करण्यासाठी घराबाहेर पडा असे आवाहन करणार आहेत. आज २ जानेवारी रोजी पवनी तालुक्यातील अड्याळ येथून या श्रीरामरथयात्रेचा श्री गणेशा झाला. आकर्षक अशा सजविलेल्या रथात विलोभनीय अशी श्रीरामाची मूर्ती, मंद स्वरात सुरू असलेल्या रामधून मुळे निर्माण झालेले राममय वातावरण अशा प्रसन्न वातावरणात निघालेल्या या श्रीरामरथयात्रेची गावागावात होणारे स्वागत आणि मिळणारा उदंड प्रतिसाद लोकांच्या मनातील रामभक्ती व्यक्त करणारा आहे. विशेष करून मातृशक्तीकडून ज्या पद्धतीने श्रीरामरथ यात्रेचे स्वागत केले जात आहे, तो प्रतिसाद पाहता खऱ्या अर्थाने हा स्वप्नपूर्तीचा सोहळा आहे असेच वाटून जाते.

अड्याळ येथून निघालेल्या या रथयात्रेचे मार्गाने कोंढा, भावड, खैरी दिवान, भुयार, दिवाण, भोजापुर, पवनी, आसगाव या गावांमध्ये उत्साहात स्वागत करण्यात आले. शक्य तिथे खासदारांकडून उपस्थिताना संबोधित केले गेले. एक कारसेवक म्हणून आलेला अनुभव, कार सेवेच्या वेळी निर्माण झालेली परिस्थिती आणि आज साकार होत असलेले प्रभू श्रीरामांचे मंदिर हे कोटयावधी भारतीयांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचे फलित असल्याचे सांगून २२ जानेवारी हा दिवस दिवाळी सारखा साजरा करा, असे आवाहन खासदार सुनील मेंढे यांनी केले. यावेळी खासदारांकडून ग्रामस्थांना पणत्यांचे वाटप करण्यात आले. पणत्यांच्या प्रकाशात आसमंत उजळून काढा असे भावनिक आवाहन यावेळी खासदारांनी केले.पवनी तालुक्यातून सुरू झालेल्या रथयात्रेला जाण्यापूर्वी भंडारा शहरातील बहिरंगेश्वर श्री राम मंदिरातून ही रथयात्रा रवाना झाली. रामप्रभू चे पूजन आणि आरती करून मार्गस्थ झालेल्या या रथयात्रेला अनेक मान्यवर आणि रामभक्तांनी उपस्थित राहून निरोप दिला. यावेळी खासदारांनी २२ जानेवारी साठी सज्ज रहा असे उपस्थित त्यांना सांगितले.यावेळी रथयात्रेत भंडारा विधानसभा प्रभारी अनुप ढोके, तालुकाध्यक्ष मोहन सुरकर, प्रकाश कुर्जेकर, अमोल उराडे, हिरालाल वैद्य, माधुरी नकाते,सीमा मोहिते, प्रभावती खोब्रागडे, डॉ.उल्हास हरडे, शिवशंकर मुनघाटे, ताराबाई कुंभलकर, अतुल मुलकलवार, देवानंद खोपे, दिनेश कोरे, परशुराम समरीत, सोमा लोहकर इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते..

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .